# प्रेसनोट दि. ०२/१०/२०१७

## <u>गुन्हे शाखे कडील वाहनचोरी विरोधी पथकाकडून दुचाकी वाहनचोर गजाआड ०४ दुचाकी वाहने हस्तगत.</u>

---

गुन्हे शाखेकडील वाहनचोरी विरोधी पथकाचे पो.हवा.४६८३ अब्दुलकरीम सय्यद यांचे बातमी प्रमाणे पो.उप.निरी. उत्तम बुदगुडे/ नागेश भोसले, पो.हवा. तुकाराम नाळे, जितेंद्र तुपे, दादा गवई, दिपक खरात, पो.ना. तुषार आल्हाट, विशाल शिर्के, हनुमंत बोराटे, पो.शि. सागर घोरपडे या स्टाफसह चा.पो.उप-निरी. प्रकाश गायकवाड यांचेसह आरोपीनामे (१) विश्वनाथ भगवान गायकवाड, वय-४३ वर्षे, रा.गणेशनगर, वाघोली,पुणे. यास पकडून त्याचेकडून ०३ मोटारसायकली हस्तगत करण्यात आलेली आहे. लष्कर पो.स्टे.,येरवडा,विमानतळ पो.स्टे. येथे दाखल असलेले ०३ गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदर आरोपीने मोटारसायकली चोरुन त्या पोलीसांनी पकडू नयेत म्हणून सदर गाडयांचे मुळ आर.टी.ओ. क्रमांक बदलून त्यावर **<u>'पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक',महाराष्ट्र शासन</u>** असे लिहीलेले आहे.

तसेच आरोपी नामे (२) परशुराम शिवाजी जाधव, रा. तुळापुर फाटा, नगररोड,पुणे यास पकडून त्याचेकडून ०१ हिरो कंपनीची एच.एफ. डिलक्स मोटारसायकल जप्त करुन बार्शी शहर पो.स्टे.गु.र.नं.४६६/१७ हा गुन्हा उघडकिस आणला आहे.

वरील ०४ मोटारसायकल किमत ०१,४०,०००/- रु. चा माल हस्तगत करुन संबंधित पो.स्टे. ला वर्ग करण्यात आलेले आहेत. सदर गुन्हयाचा तपास पो.उपनिरीक्षक नागेश भोसले हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, पोलीस उप-आयुक्त श्री. पंकज डहाणे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. संजय निकम, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वाहनचोरी विरोधी पथक, यांनी व त्यांचेकडील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेली आहे.